# अजुनी तुझीच आहे

सौ. शोभा सतीश राऊत

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 286

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अजुनी तुझीच आहे : सौ. शोभा सतीश राऊत**

© **सौ. शोभा सतीश राऊत**

'शब्दांगण', प्लॉट नं. १७,
जरगनगर, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २६३७७७८, मो. ९९२३८९७८९८

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
पहिली आवृत्ती- १९८५, दुसरी आवृत्ती- २००२,
तिसरी आवृत्ती- २०११, चौथी आवृत्ती- २९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १५०/-

---

(या कादंबरीतील सर्व पात्रे व प्रसंग काल्पनिक आहेत. वास्तवाशी मेळ जमल्यास तो केवळ योगायोग समजावा.)

कोल्हापुरात मी नवीन असताना आणि आजही

ज्या मला मोठ्या बहिणींप्रमाणे साथ देतात,

त्या ताई आणि माईस, अर्थात

सौ. वैजयंती विनायक सरनाईक (माई)

आणि

सौ. छाया (रुपाली) तुकाराम पाटील (ताई)

या दोघींना सविनय अर्पण...

# १

''आई.....आई....ए आई'' अशी मोठ्याने हाक मारीत संजू घरात आला. मी नुकतीच कामावरून आले होते. तेवढ्यात संजू शाळेतून घरी आला होता. मला शोधत तो आतल्या खोलीत आला. त्याचा चेहरा आनंदाने न्हाऊन निघाला होता.

''आई, आज किनई शाळेमध्ये खूप गंमत झाली.'' शाळेत एवढेसे काही झाले, की त्याचा समग्र रिपोर्ट संजू मला सांगत असे. काही वेळा तर त्याच्या त्या बडबडीत काही अर्थही नसतो. त्यामुळे मी त्याला म्हणाले,

''हे बघ संजू, मी आत्ताच येतेय्-कपडे तरी बदलू दे. मग सांग तुझी गंमत मला.''

''अं-हं-तसं नाही आई. माझी गंमत प्रथम तू ऐकायला पाहिजेस. आई, अगं आमच्या शाळेत आज ना खेळाच्या स्पर्धा झाल्या. लांब उडी, उंच उडी, रनिंग, लंगडी....खूऽऽप खूऽऽप आणि आईऽऽ माझा किनई तीन स्पर्धेत पहिला नंबर आला. आमच्या सरांनी मला शाबासकी दिली.''

''अरे वाऽ! वा! माझ्या संजू राजाचा पहिला नंबर आला? शाब्बास!'' मी त्याला जवळ घेतले. अगदी हृदयाजवळ. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रूंनी गर्दी केली. खरे म्हणजे मला त्याचे खूप कौतुक करायचे होते- पण गहिवरल्यामुळे मी पुढे काही बोलूच शकले नाही.

''हे काय आई, तू रडतेस?''

''छट्! रडतेय कुठे? अरे मला खूऽऽ प खू ऽऽप आनंद झाला आहे ना, म्हणून डोळ्यांत पाणी आले.''

''आई, खेळून खेळून खूप दमलोय मी. भूकही खूप लागलीय. चटकन काहीतरी कर ना खायला''

''अरे लबाडा! भूक लागलीय की गोड गोड शिरा खायची लहर आलीय? मी आत्ता करते शिरा.'' चटकन शिरा केला. शिरा खाताना संजू म्हणत होता,

''आई, किती छान झालाय शिरा. तू सुद्धा घे ना गं!''

संजूला शिरा खूपच आवडतो. मी जाणून होते-संजू आता पोटभर शिराच खाणार. जेवणार सुद्धा नाही.

संजू अभ्यासाला बसला. मी स्वयंपाकघर गाठले. फक्त माझ्याचसाठी स्वयंपाक करायचा होता. स्वयंपाक करताना मनात संजूचा विचार चालला होता.

संजू माझा एकुलता एक मुलगा जात्याच हुशार. त्याची बालबुद्धी भारी चौकस होती. निरनिराळे प्रश्न विचारून मला असा सतावायचा की विचारूच नका. त्याचा एक प्रश्न मात्र हृदयाला जाऊन भिडायचा.

''आई, माझे बाबा केव्हा येणार गं?खूऽऽप खूऽऽप लांब राहतात ना ते?त्यांना बोलाव ना आपल्याकडे. माझ्या मित्रांचे बाबा कसे त्यांच्याजवळ राहतात?''

तो असे प्रश्न विचारू लागला, की मी अगदी भांबावून जाते. प्रत्येक वेळी नवीन सबब शोधून काढायची आणि कशीबशी त्याची समजूत घालायची. संजूचे समाधान व्हायचे, अगदी तेवढ्यापुरते. पण मी मात्र त्याच्या प्रश्नांनी अंतर्बाह्य ढवळून निघायची. गाळात रूतलेल्या स्मृती वर तरंगू लागायच्या-आणि नेहमीप्रमाणे माझ्या मनात द्वंद्व सुरू व्हायचे-'मी केले ते बरोबर की चूक?'

''संजूऽऽ ए संजूराजा'' मी आतून हाक मारली, परंतु संजूची काहीच हालचाल ऐकू येईना. बाहेर येऊन पाहते तर, अभ्यास करता करता तो तसाच झोपून गेलेला. त्याच्याकडे पाहून मला हसू आले. त्याच्या हातातून पुस्तक अर्धवट खाली लोंबकळत होते. त्याच्या हातातले पुस्तक मी काढून घेतले आणि त्याला उचलून व्यवस्थित कॉटवर झोपवले. माझी बोटे त्याच्या केसांवरून फिरू लागली. नजर त्याच्या चेहऱ्यावर स्थिर झाली. किती गोड दिसतो. माझा संजू. अगदी सागरसारखा! संजू झोपेतच हसला. त्याचे ते हसणे पाहून मला सागरची-संजूच्या वडिलांची तीव्रतेने

आठवण आली. सागरची मूर्ती डोळ्यासमोर उभी राहिली. सागर अगदी असाच हसायचा–

मी चटकन उठले. मोठा लाईट घालवून डीमलाईट लावला. कॉटवर आडवी झाले. आता कशाचाच विचार करायचा नाही. सागरचा विचारा मनातून काढून टाकण्याची माझी धडपड सुरू झाली. छे! छे! मला काहीच आठवायचे नाही. मी मुद्दाम संजूचा विचार मनात आणला. उद्या शनिवार. संजूची सकाळची शाळा. आपल्याला लवकर उठावे लागणार. त्याची सर्व तयारी वेळेत व्हायला पाहिजे. संजू म्हणजे अस्सा आहे ना! सकाळी लवकर उठतच नाही. अगदी भंडावून सोडतो......

संजूचा विचार करताना हळूच पुन्हा सागर केव्हा मनात येऊन बसला समजलेही नाही. किती वेळा त्या बाबतीत मन कठोर केले. पण ते माझ्या आवाक्याबाहेरचेच! मी फार अस्वस्थ झाले. नेहमीच हे असे घडते. मनाला बजावूनसुद्धा गतजीवनाचा चलत्‌चित्रपट मुकपणे'' माझ्या मनश्चक्षूंसमोर गतिमान होऊन फिरतच राहतो, कधी हसवतो! कधी रडवतो! कधी कधी बेचैन करतो.

जे आपण विसरण्याचा प्रयत्न करतो ते.....तेच नेमके का आठवते? आठवणींचा हा खेळ कधीच का थांबणार नाही? खरंच आठवणीसुद्धा किती निष्ठुर असतात. मुद्दाम, हृदयाला व्याकूळ करतात. नको त्या आठवणी विसरून जाण्याची माणसाला दैवी शक्ती असती तर किती बरे झाले असते!

आता संजू हसताना अगदी सागरसारखा दिसला बस्स! या एवढ्या कारणावरून हृदयाच्या कप्प्यात बंद करून ठेवलेल्या आठवणी उफाळून वर आल्या आहेत.

सागर, तुला येते का रे माझी आठवण? मी मात्र तुझ्या आठवणीच्या सहाऱ्यावर जगते आहे. सागर, किती लवकर आपले सहजीवन संपले? ते सारे सुख–तो आनंद....सा ऽ रे संपले.

खरंच सागर, आज इतक्या वर्षांनंतरही चुकले कोणाचे याचे उत्तर देऊ शकत नाही. मी . मला वाटते, आपल्या दोघांचे काही चुकले नाही. जे काही झाले ते त्या वेळच्या परिस्थितीमुळे झाले. होय हेच बरोबर.

त्या वेळी माझ्या सहनीशलतेची परिसीमा ओलांडली गेली होती. माझ्याजवळ फक्त दोनच पर्याय उरले होते. त्यांतील मला जो योग्य वाटला तो मी स्वीकारला

आणि त्या जीवनरेषेवरून आज मी प्रवास करते आहे.. ती रेषा सागरच्या जीवनरेषेला समांतर असणार. आज तर मला हे सुद्धा माहिती नाही सागर, तू कोणत्या बिंदूवर उभा आहेस. नियमाला अपवाद ठरून ही समांतर रेषा वळणे घेत कधी तुझ्यापर्यंत येईल का रे सागर?

अंऽऽऽ हं! ते आता आता या जन्मीतरी शक्य नाही. शेवटी स्वप्नं ही स्वप्नंच ठरली. आपण दोघांनी मिळून किती इंद्रधनुष्यी स्वप्नं रंगविली होती. सागर, ती सर्व भग्न झाली का....?कशी....केव्हा....? या प्रश्नांची उत्तरंही अर्धवट राहतात. पण सागर, एक सांगते तुला, ही तुझी सरिता, अजूनही तुझीच आहे, तुझीच राहील. मरेपर्यंत!

सागर, आपले जीवन असे विस्कळीत होणार होते तर का बरे देवाने आपली भेट घालून दिली आणि त्यानंतर एकत्र आणले?

✦✦✦

# २

अजूनही ते सारे जसेच्या तसे आठवते आहे. मी प्रथम सागरला पाहिले ते कॉलेजमध्ये. त्याच्या खळखळत्या हास्यामुळे माझी नजर त्याच्याकडे वळली.

त्या दिवशी आम्ही मैत्रिणी पोर्चमध्ये उभ्या होतो. आमच्या आपल्या नेहमीप्रमाणे इकडच्या-तिकडच्या गप्पा चालल्या होत्या. एवढ्यात खळखळणारे हास्य कानावर आले. अगदी मोठ्याने. क्षणभर पोर्चमध्ये शांतता झाली.

आम्ही सर्वांनी माना वळवून त्या दिशेला पाहिले. पाचसहा विद्यार्थ्यांचा ग्रुप चालला होता गप्पात रंगलेला. त्यातीलच एक हॅण्डसम मुलगा हसत होता. त्याचे इतरत्र कुठे लक्षही नव्हते. खरंच त्याच्या हास्यात दुसऱ्याला मोहविणारे काहीतरी होते खास. निदान मला तरी त्या क्षणी तसे वाटले आणि मी अगदी अभावितपणे बोलून गेले,

''किती गोड हसतोय नाही तो मुलगा?''

माझे हे वाक्य संपले आणि माझ्या सर्व मैत्रिणी मोठ्याने हसू लागल्या. मी पटकन स्वत:ला सावरले पण तोपर्यंत आरतीने माझी फिरकी घेण्यास सुरूवात केलीच.

''रिता, काय विचार आहे? आवडला वाटतं तो तुला फार.''

तेवढ्यात प्राची म्हणाली,

''ए, रिता बोलावून आणू का त्याला? सांगते, बाबा या माझ्या मैत्रिणीसमोर हास पाहू मघासारखा, म्हणजे आमची रिता म्हणेल किती गोड हसता तुम्ही.''

मला थोडासा रागच आला. मी रागाने म्हणाले, ''काय गं तुम्ही ह्या अशा? बिचाऱ्याचे हसणे आवडले मला-आणि ते आवडले म्हणून बोलले तर काही मी मोठी चूक केली नाही.''

माझे वाक्य संपते न् संपते तोच पूर्वीपेक्षा सर्वजणी मोठ्याने हसू लागल्या. आशा म्हणाली,

''अय्या! आता तर तो बिच्चाराही झाला. ए रिता, खरेच का गं तो एवढा बिच्चारा आहे? बाकी त्या बिच्च्याऱ्याला ही बिच्चारी भेटली म्हणजे दोन्ही बिच्चाऱ्यांची....''

पुढे ऐकायला मी तिथे थांबलेच नाही. सरळ घरचा रस्ता धरला.

दुसऱ्या दिवशी आम्ही सर्व मैत्रिणी एकत्र जमल्यावर आशाला कालची गंमत आठवली, ती इतरांना ते सांगू लागली. आमच्या ग्रुपमधील राम, दिलीप, विलास, पांडू, सगळेच माझ्याकडे बघून हसू लागले.

''रिताचा बिच्चारा कोण हे बाकी शोधून काढायलाच पाहिजे.''

दिलीप हसत म्हणाला आणि त्याच्याबरोबर सर्वच एका सुरात म्हणाले,

''बिच्चारा शोधलाच पाहिजे.''

मी मात्र त्या सर्वांच्या वेडेपणाला हसत होते.

त्यानंतर बऱ्याच दिवसांत तो मला दिसलाच नाही. रोहिणी, आशा, नीता, जयू, प्राची वगैरे माझ्या मैत्रिणी मला नेहमी म्हणायच्या,

''अग रिता, आज आम्हाला बिच्चारा दिसला.'' मला माहिती होते, या मला मुद्दाम चिडवण्यासाठी अशा बोलतात. मी चक्क दुर्लक्ष करीत असे.

कॉलेजच्या निवडणुकांनी सध्या कॉलेज दुमदुमत होते. रोज पहावे तर एक एक नवीन फलक झळकत होते. सर्वत्र उत्साहाला पूर आला होता. प्रचाराच्या मोहिमा निघत होत्या. भेटेल तो म्हणे यांना मत द्या, त्यांना मत द्या. या वर्षी दोन मुली आणि पाच मुले निवडणुकीसाठी उभी होती. पण त्यांपैकी दोन्ही मुलींच्या बाबतीत कोणी चांगले बोलत नव्हते. तसेच उभं राहणाऱ्यांमध्ये मोहन जाधव म्हणून मुलगा होता – तो खरोखरी नावाप्रमाणे मोहन होता. त्याला मित्र असे नव्हतेच. होत्या त्या सर्व मैत्रिणी! पहावे तेव्हा त्यांच्यात हा हसत-बोलत बसलेला. या तिघांनाही मते द्यायची नाहीत, हे आम्ही ठरविले होते. मत कोणाला द्यायचे याचा आमचा विचार चालला होता. तेवढ्यात दिलीप तेथे आला.